**प्रेसनोट** **ला.प्र.वि., जळगाव.**
**दि. २०/०५/२०२६.**

**उप निबंधक सह संस्था, जळगाव येथील उप निबंधक जगदीश बाबुराव बारी, (सहकार खाते, वर्ग-१) यांनी प्रथम ५,००,०००/- मागणी करून तडजोडीअंती ३,००,०००/- रू. मागणी करून त्यापैकी पहीला हफ्ता १,५०,०००/- रू. आरोपी देविदास धनसिंग पाटील यांच्यामार्फत स्विकारल्याने त्यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायदयान्वये कारवाई केलेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | :- | नाशिक/जळगाव |
| **सरकारतर्फे फिर्यादी** | :- | रेश्मा चंद्रकांत अवतारे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. नंदुरबार, कॅम्प जळगांव |
| **पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक** | :- | जिल्हापेठ पोलीस ठाणे गु.र.नं.        /२०२६. |
| **कलम व गुन्हा दाखल दिनांक** | :- | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ चे कलम **७ व १२** प्रमाणे. |
| **आरोपीचे नाव, वय व कार्यालय** | :- | **१. जगदीश बाबुराव बारी, वय ५६ वर्षे, पद- उप निबंधक, उप निबंधक सह संस्था, जळगाव, रा. शांतीनगर, यावल रोड, भुसावळ, (वर्ग -०१)**<br>**२. देविदास धनसिंग पाटील, वय ४४ वर्षे, मानद कार्यकारी अधिकारी, जळगाव जिल्हा बॅंक असोसिएशन, रा. भुरे मामलेदार प्लॉट, शिवाजीनगर, जळगाव. (खाजगी इसम )** |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | :- | ५,००,०००/- तडजोडीअंती ३,००,०००/- रू. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | :- | १,५०,०००/- (मागणीपैकी पहीला हफ्ता ) |
| **थोडक्यात हकिकत** | :- | प्रस्तुत बातमीतील हकिकत अशी की, यातील तक्रारदार यांचेवर अवैध सावकारी धंदा कारवाईच्या अनुषंगाने कारवाई झाली होती. सदरची सुनावणी ही उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव तालुका, जळगाव येथे सुरु होती. तक्रारदार हे त्यांचेविरुध्द सुरु असलेल्या अवैध सावकारी चौकशी प्रकरणी विचारपुस करण्यासाठी व पुढील सुनावणीची तारीख विचारण्यासाठी उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव या कार्यालयात गेले असता तेथील श्री. जगदिश बारी, उपनिबधंक, सहकारी संस्था जळगाव यांनी तक्रारदार व त्यांच्या पत्नीविरुध्द गुन्हा दाखल होवु नये, म्हणुन अवैध सावकारी बाबतचा चौकशी अहवाल अनुकुल पाठविण्यासाठी ५,००,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती. त्याबाबत तक्रारदार यांनी दि. १८/०५/२०२६ रोजी ला.प्र. वि. जळगाव घटकास तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १८/०५/२०२६ रोजी पंचासमक्ष उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव तालुका जळगाव येथे लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजमावली असता यातील आलोसे जगदीश बारी यांनी तक्रारदार यांचेविरुध्द अवैध सावकारी बाबतचा अहवाल अनुकुल पाठविण्यासाठी प्रथम ५,००,०००/- रुपयांची मागणी करून तडजोडीअंती ३,००,०००/- रू. लाचेची मागणी केली. तसेच पडताळणी दरम्यान आलासे क्र. ०१ हे बोलले की, तुम्ही मागच्या प्रकरणाच्या वेळेस वकील लावला म्हणुन आमचे खुप मोठे नुकसान केले, म्हणुन नकारात्मक अहवाल दिला होता. परंतु आता अनुकुल अहवाल पाठवितो, असे सांगुन |

| | | |
|---|---|---|
| | | लाचेच्या मागणीपैकी पहीला हफता १,५०,०००/- रू. हा आरोपी नामे देविदास पाटील यांचेकडे दिनांक २०/०५/२०२६ रोजी देण्यास सांगितले.<br>त्याप्रमाणे आज दिनांक २०/०५/२०२६ रोजी सापळा कारवाई आजमावली असता आलोसे जगदीश बारी यांचे मागणीप्रमाणे आरोपी क्र. २ देविदास पाटील यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची १,५०,०००/- रू. रक्कम उपनिबंधक (परसेवा), सहकारी संस्था, जळगाव जिल्हा अर्बन को-ऑपरेटिव्ह बॅक्स असोसिएशन लि., जळगाव, तिसरा मजला, बी.जे. मार्केट, जळगाव येथे स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. |
| **जप्त मुद्देमाल** | :- | **१,५०,०००/- रू. लाचेची रक्कम** |
| **सापळा कारवाई** | :- | **पर्यवेक्षण अधिकारी :- श्री.योगेश ठाकूर, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.जळगांव**<br>**सापळा अधिकारी** :- रेश्मा अवतारे, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.जळगांव<br>**सापळा पथक** :- पो.नि. हेमंत नागरे, पोहेकॉ/बाळु मराठे, मपोहेकॉ/ संगिता पवार, पो.कॉ/मनोज पाटील व पो.कॉ./सचिन चाटे सर्व नेमणुक ला.प्र.वि.जळगांव<br>**तपासी अधिकारी** :- श्रीमती स्मिता नवघरे, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.जळगांव |
| **मागदर्शन** | :- | **१) मा. श्री. भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा.श्री. माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र,नाशिक.<br>३)मा.श्री.सुनील दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.,नाशिक परिक्षेत्र,नाशिक. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.**

**संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जळगाव.**

संकेतस्थळ :– **acbmaharashtra.gov.in**

ई–मेल:– **spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacbjalgaon@gmail.com**

ऑनलाईन तक्रार :– **acbmaharashtra.net**

टोल फ्रि क्रमांक :– **1064**

दुरध्वनी क्रमांक :– **0257-2235477**

व्हॉट्सअॅप मोबाईल क्रमांक :– **75886 61064**